जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर- 22/2022
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 24.02.2022

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

### सर्वसाधारण सभेची सूचना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ''ड'' चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) च्र प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महापौर, सौ. जयश्री निलेश पावडे यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा दिनांक 04.03.2022 रोजी दुपारी 03.00 वाजता **ONLINE** व्दारे आयोजीत केली आहे.

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी **ONLINE** सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे.

स्वाक्षरीत/-

(मा. महापौर यांच्या मान्यतेने)

(स. अजीतपालसिंघ संधु)
नगरसचिव
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

प्रति
श्री/श्रीमती --------------------------------
सदस्य /सदस्या,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

### नगरसचिव कार्यालयाचा प्रस्ताव

विषय क्रं. 01

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बालकल्याण समितीच्या खालील (11) सदस्यांची मुदत दिनांक 12.03.2022 रोजी संपत असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील सुधारीत कलम 31(अ) मधील तरतुदीनुसार व महानगरपालिका व स्थायी समितीचे कामकाज नियम 4-ब नुसार पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व माहिला व बालकलयाण समितीवर नविन नामनिर्देशनाव्दारे 11 (अकरा) सदस्यांची उर्वरीत कालावधीसाठी (स्थायी समितीवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती केलेल्या सदस्यांप्रमाणे) पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण शिक्षण व महिला व बालकल्याण समितीवर नियुक्ती करणे बाबत.

01) बिरकले सरिता बालाजीराव, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
02) नेरलकर अपर्णा ऋषिकेश, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
03) पाटील संगिता विठ्ठल, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
04) कापुरे गितांजली रामदास, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
05) आयेशा बेगम शे. असलम, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
06) गोडबोले ज्योत्सना राजू, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
07) अरशीन कौसर मोहम्मद हबीब, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
08) खालसा प्रकाशकौर सुरजितसिंघ, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
09) कल्याणकर ज्योती किशन, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
10) पवळे पुजा बालाजी, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
11) गोरे शांता संभाजी, भारतीय जनता पार्टी

Scanned with CamScanner

## आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव

विषय क्रं. 02

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं नावाशमनपा-2016/प्र.क्र.90/16/नवि-24 दिनांक 05 जानेवारी 2022 अन्वये श्री मुस्तफा बंदे अली लिपीक आरोग्य विभाग यांना नावाशमनपा यांनी महानगरपालिकेच्या कामात रक्कमेच्या अपहार प्रकरणी त्यांना दि. 20.11.2012 च्या कार्यालयीन आदेशान्वये सेवेतून कायमचे कमी करण्यात आले त्यांना पुर्ववत कामावर पुर्नस्थापित करण्याबाबत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्रं. 163 दि. 24.01.13 व स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 108 दि. 01.12.14 सदर दोन्ही ठराव विखंडीत करण्याची विनंती आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी शासनास केली आहे.

सदरील शासन निर्णयाव्दारे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रं. 163 दि. 24.01.13 व स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 108 दि. 01.12.14 हे नियमांशी विसंगत तसेच महानगरपालिकेच्या आर्थीक हिताच्या विरुध्द असल्यामुळे सदर दोन्ही ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिपयम 1949 चे कलम 451 (3) नुसार अंतिमत: विखंडित करण्यात आले आहे त्याची नोंद घणे बाबत.

विषय क्रं. 03

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नामपा-2021/प्र.क्र.89/नवि-24 दिनांक 31. जानेवारी 2022 अन्वये श्री आलाजी देवराव देसाई स्वच्छता निरीक्षक, क्षेत्रीय कार्यालय क्रं. 03 नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत व्यवसाय परवाना व व्यवसाय परवाना पुतनीकरण शुल्कापोटी वसुली केलेल्या रक्कमेचा अपहार प्रकरणी संबंधीतांस निलंबीत करुन अपहार प्रकरणी गुन्हा मागे घेण्याबाबत महानगरपालिका स्थायी समिती समोर अपिल दाखल केले. त्यानुसार स्थायी समितीने सहानुभुतीपुर्वक विचार करुन किरकोळ स्वरुपाची शास्ती लावून सेवेत रुजु करुन घेण्यास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 481 मधील तरतुदीनुसार संबंधीतावरील गुन्हा मागे घेण्याची मान्यता देते असा ठराव क्रं. 55 दिनांक 26.10.20 समंत केलेला आहे.

श्री बालाजी देवराव देसाई स्वच्छता निरीक्षक यांनी व्यवसाय परवाना व व्यवसाय परवाना पुतनीकरण शुल्कापोटी वसुली केलेल्या शासकीय रकमेचा अपहार केला आहे. श्री बालाजी देवराव देसाई यांची सदरहु कृती ही कार्यालयीन कामकाजाच्या विरुध्द आहे तसेच त्यांच्यावरील ठेवण्यात आलेले दोषारोप क्रं. 01 व 02 ही सिध्द झालेले आहेत त्यामुळे महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 55 दिनांक 26.10.20 विखंडीत करण्याची विनंती आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी दिनांक 03.03.21 च्या पत्रान्वये केलेली आहे.

सदरील शासन निर्णयाव्दारे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा ठराव क्रं. 55 दिनांक 26.10.20 हा प्रशासकीय टिप्पणीच्या विरुध्द आहे त्यामुळे महानगरपालिका अधिनियमातील कलम 451 (1) नुसार विखंडित करण्यासाठी प्रथमत: निलंबित करण्यात येत आहे. सदर ठराव निलंबनाप्रकरणी संबंधीतांना अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांनी निलंबन आदेशाच्या दिनांकापासुन 30 दिवसांच्या आत शासनास अभिवेदन करणे आवश्यक आहे त्याची नोंद घणे बाबत.

विषय क्रं. 04

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नामपा-2021/प्र.क्र.112/नवि-24 दिनांक 31. जानेवारी 2022 अन्वये श्री राजेंद्र दिगंबर गायके, यांची कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नांदेड महानगरपालिकेने नियुक्ती करण्यात आली आहे. श्री गायके यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 मधील कलम 7 मधील तरतूदिनुसार पोलिस स्टेशन वजिराबाद, नांदेड येथे

Scanned with CamScanner

गुन्हा नोंदविलेला आहे. श्री गायके, यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविलेला असल्यामुळे त्यांची कंत्राटी सेवा महानगरपालिकेने दि. 20.09.19 च्या आदेशान्वये संपुष्टात आणली आहे. तसे, सत्र न्यायालयात खटला चालविण्यास महानगरपालिकेकडून मंजुरी देण्यात आलेली आहे.

श्री राजेंद्र गायके यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच स्विकारल्या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 मधील कलम 07 मधील तरतुदीनुसार पोलीस स्टेशन वजिराबाद नांदेड येथे गुन्हा नोंदविलेला आहे त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविलेला असल्यामुळे त्यांची कंत्राटी सेवा महानगरपालिकेने दि. 20.09.19 च्या आदेशान्वये संपुष्टात आणली आहे तसेच सत्र न्यायालयात खटला चालविण्यास महानगरपालिकेकडून मंजूरीही देण्यात आलेली आहे. अशापरिस्थितीत महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 35 दिनांक 30.07.20 हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विसंगत तसेच महानगरपालिकेच्या हिताविरुध्द आहे. नमूद बाबी विचारात घेऊन सदरचा ठराव क्रं. 35 दिनांक 30.07.20 हा निलंबित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

सदरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 35 दिनांक 30.07.20 हा महानगरपालिकेच्या हिताच्या विरुध्द असल्यामुळे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 451 (1) नुसार विखंडीत करण्यासाठी प्रथमतः निलंबित करण्यात येत आहे. सदर ठराव निलंबनाप्रकरणी संबंधीतांना अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांनी निलंबन आदेशाच्या दिनांका पासुन 30 दिवसाच्या आत शासनास अभिवेदन करणे आवश्यक आहे त्याची नोंद घेणे बाबत.

विषय क्रं. 05

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नामपा-2019/प्र.क्र.106/नवि-24 दिनांक 31. जानेवारी 2022 अन्वये श्री संभाजी माधवराव कास्टेवाड, जाकत अधिक्षक नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांना नोट बंदीच्या काळात वसुली कामात निष्काळजीपणा, कर वसुली बैठकींना उपस्थित न राहणे, तसेच उपस्थिती पटावर स्वाक्षरी करुन कार्यालयात अनुपस्थित राहणे ई. कारणामुळे दिनांक 14.11.16 रोजीच्या आदेशान्वये महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले, तदनंतर श्री कास्टेवाड यांनी त्यांच्या विरुध्द सुरु केलेल्या विभागीय चौकशीच्या अधीन राहुन त्यांना महानगरपालिकेच्या सेवेत दि. 08.03.17 च्या आदेशान्वये पुनःस्थापित करण्यात आले.

प्रस्तुत चौकशी अहवालाच्या आधारे श्री कास्टेवाड जकात अधिक्षक यांचा दि. 14.11.16 ते 07.03.17 असा 114 दिवसांचा निलंबन कालावधी हा निलंबन काळ म्हणुन गृहीत धरण्यात आलेला असुन कामात निष्काळजीपणा केल्याचा ठपका त्यांच्यावर दिनांक 11.10.18 च्या आदेशान्वये ठेवण्यात आलेला आहे. सदर शिक्षेविरुध्द श्री कास्टेवाड यांनी प्रस्तुत निलंबन कालावधी हा कर्तव्यकाळ म्हणुन गृहीत धरण्यात यावा व ठपका रद्द करण्याबाबत महानगरपालिकेच्या स्थायी समितीकडे दिनांक 20.12.18 रोजी अपिल दाखल केले होते स्थायी समितीनी श्री कास्टेवाड यांचा निलंबन कालावधी हा कर्तव्यकाळ म्हणुन नियमीत करण्याबाबत दिनांक 30.01.19 रोजी ठराव क्रं. 127 समंत केला आहे.

श्री कास्टेवाड जकात अधिक्षक यांच्याविरुध्दचे दोषारोप अंशतः सिध्द झाल्यामुळे त्यांच्यावर किरकोळ स्वराफपाची शिक्षा बजावण्यात आलेली आहे तसेच त्यांनी स्थायी समितीकडे विहित मुदतीत अपिल दाखल केलेले नाही. त्यांच्यावर बजावलेली शिक्षा ही किरकोळ स्वरुपाची असल्यामुळे ती रद्द किंवा त्यामध्ये बदल करता येणार नाही असा प्रशासकीय अहवाल महानगरपालिकेने स्थायी समितीच्या निदर्शनास आणुन देण्याबाबत नगरसचिव महानगरपालिका यांना 04.02.19 च्या पत्रान्वये कळविलेले तथापि स्थायी समितीने श्री कास्टेवाड यांचा निलंबन कालावधी कर्तव्य कालावधी म्हणुन सदर ठराव क्रं. 127 दि. 30.01.19 समंत करुन नियमीत केला. त्यामुळे महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 127 दि. 30.01.19 हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विसंगत

Scanned with CamScanner

तसेच महानगरपालिकेच्या आर्थीक हिताच्या विरुध्द असल्यामुळे सदर ठराव महाराष्ट्र महजानगरकपालिका अधिनियम 1949 चे कलम 451 (1) नुसार विखंडीत करण्यासाठी शासन निर्णय दिनांक 30.08.19 अन्वये निलंबन करण्यात आला होता.

सदर ठराव क्रं. 127 दि. 30.01.19 हा निलंबित करुन त्याबाबत अभिवेदन मागविण्यात आलेले होते त्याअनुषंगाने श्री कास्टेवाड जकात अधिक्षक यांनी त्यांच्या दिनांक 20.09.19 च्या निवेदनाव्दारे अभिवेदन शासनास सादर केले.

श्री कास्टेवाड यांचे निवेदन व त्याबाबत महानगरपालिका प्रशासनाचे अभिप्राय याबाबत तपासणी करण्यात आली यानुसार श्री कास्टेवाड यांचे निवेदन अमान्य करुन महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 127 दि. 30.01.19 हा नियमानुसार नसून, महानगरपालिकेच्या आर्थीक हिताच्या विरुध्द असल्यामुळे सदर ठराव उपरोक्त नियम 451(3) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अंतिमतः विखंडीत करण्याचा बाब शासनाच्या विचाराधीन होती.

करिता महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नामपा-2019/प्र.क्र.106/नवि-24 दिनांक 31. जानेवारी 2022 अन्वये श्री संभाजी माधवराव कास्टेवाड जाकत अधिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांचा दिनांक 14.11.16 ते 07.03.17 हा निलंबन कालावधी निलंबन काळ म्हणुन गृहीत धरण्याबाबत महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 127 दि. 30.01.19 हा नियमाशी विसंगत तसेच महानगरपालिकेच्या आर्थीक हिताच्या विरुध्द असल्यामुळे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 451 (3) नुसार अंतिमतः विखंडीत करण्यात येत आहे त्याची नोंद घेणे बाबत.

विषय क्रं. 06

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. नांमपा-2020/प्र.क्र.19/नवि-24 दिनांक 01.02.2022 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचया आस्थापनेवरील श्रीमती महामती गौतमी हंकारे, सेवानिवृत्त सह शिक्षिका यांना महानगरपालिकेने दिनांक 26.02.2017 च्या आदेशान्वये निलंबित केलेले होते. श्रीमती महामंती हंकारे यांना त्यांच्याविरुध्दसुरु असलेल्या विभागीय चौकशीच्या अधीन राहुन महानगरपालिकेने दि. 26.07.17 च्या आदेशान्वये सेवेत पुनःस्थानित केले व त्यांच्या निलंबन कालावधी हा निलंबन काळ म्हणून गृहित धरण्यात आलेला आहे सदर आदेशाबाबत श्रीमती हंकारे यांनी स्थायी समितीसमोर अपिल दाखल केले होते स्थायी समितीने ठराव क्रं. 50 दि. 26.11.19 नुसार श्रीमती हंकारे यांचा दि. 16.02.17 ते 26.07.17 हा निलंबन कालावधी सेवाकाळ म्हणून गृहित धरण्यास मान्यता दिलेली आहे स्थायी समितीने ठराव क्रं. 50 दि. 26.11.19 हा संयुक्तीक व महानगरपालिकेच्या हिताचा नसल्यामुळे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 451(1) मधील तरतुदीनुसार विखंडीत करण्याची विनंती आयुक्त मनपा यांनी शासनास केली आहे.

श्रीमती महामती गौतमी हंकारे सेवानिवृत्त सहशिक्षीका यांच्याविरुध्दच्या विभागीय चौकशीमध्ये त्यांच्यावरील दोषारोप क्रं. 03 अंशतः सिध्द झाल्यामुळे महानगरपालिकेने त्यांचा निलंबन कालावधी हा निलंबन काळ म्हणून गृहित धरला आहे. सदरची कारवाई महानगरपालिका आयुक्तांनी श्रीमती महामती गौतमी हंकारे यांच्याविरुध्द अंशतः सिध्द झालेल्या दोषारोपाच्या अनुषंगाने केलेली असल्याचे निदर्शनास येते. महानगरपालिकेच्या स्थायी समितीने श्रीमती महामती गौतमी हंकारे यांच्या विनंतीच्या अनुषंगाने समंत केलेला उक्त ठराव क्रं. 50 दि. 26.11.19 विखंडीत करण्याची विनंती आयुक्त मनपा यांनी दि. 05.02.20 च्या पत्रान्वये केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. नांमपा-2020/प्र.क्र.19/नवि-24 दिनांक 01.02.2022 च्या शासन निर्णयानुसार :- नावाशमनपाकेच्या स्थायी समितीने दिनांक 26.11.2019 रोजी समंत केलेला ठराव क्रं. 50 हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार संयुक्तिक व

Scanned with CamScanner

महानगरपालिकेच्या हिताच्या विरुध्द असल्यामुळे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 451(1) नुसार प्रथमतः निलंबित करण्यात येत आहे. सदर ठराव निलंबना प्रकरणी संबंधीतांना अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांनी निलंबन आदेशाच्या दिनांकापासून 30 दिवसांच्या आत शासनास अभिवेदन करावे याची नोंद घेणे बाबत.

विषय क्रं. 07

विषय :- महानगरपालिकेच्या हद्यीत शहर उपजीविका केंद्र (CLC) स्थापन करणेकरीता प्रस्तावित जागेऐवजी दुस-या ठिकाणी शहर उपजीविका केंद्र (CLC) स्थापन करणे बाबत

संदर्भ :- 1) मा.सहसंचालक यांचे पत्र DAY-NULM/SMIDC/CLC/8/D-11/2019-20/3136 दि. 10.10.19

2) मा.सहसंचालक यांचे पत्र DAY-NULM/SMIDC/CLC/10/D-11/2020-21/2819 दि. 04.12.20

3) जा.क्रं. नावाशमनपा/DAY-MULM/9298/2020 दि. 24.12.2020

4) जा.क्रं. नावाशमनपा/ DAY-MULM/5474/2021 दि. 27.08.2021

5) मा. महापौर व मा. आयुक्त यांचेशी दिनांक 10.02.2022 रोजी झालेली मौखिक चर्चा.

महानगरपालिकेच्या हद्यीतील दी.अं.यो-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY MULM) अंतर्गत शहरी उपजिविका केंद्र (CLC) स्थापन करणे बाबत 01 (एक) आर्थिक व भौतिक उद्दिष्ट महानगरपालिकेस प्राप्त आहे. त्याअनुषंगाने शहरी उपजीविका केंद्र (CLC) स्थापन करणेकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे सादर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये वर्कशॉप पाण्याच्या टाकीजवळ सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने (SJSRY) अंतर्गत लोकसेवा केंद्राच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले होते.

त्याअनुसार संदर्भ क्रं. 04 अन्वये सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने प्रकल्प अहवाल शासनस्तरावर सादर करण्यात आलेला होता. सवब नियोजित जागेत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा पशुवैद्यकीय दवाखाना अस्तित्वात असल्याने मा. महापौर व मा. आयुक्त यांचे निर्देशानुसार त्याजागे ऐवजी वर्कशाप पाण्याच्या टाकीच्या बाजूस पशुवैद्यकीय दवाखान्यासमोरील मोकळया भूखंडावर टीन शेड मारुन शहरी उपजीविका केंद्र (CLC) स्थापन करण्यास सुचविलेले आहे.

त्यानुसार शहर उपजीविका केंद्र स्थापन करणे योग्य आहे. तसेच तेथे दोन मोठे हॉल व संडास बाथरुम व नळ कनेक्शन इत्यादीचा समावेश आहे. शहर उपजीविका केंद्र (CLC) अंतर्गत शहरात नागरिकांना खालील प्रमाणे सुविधा देणे अपेक्षित आहे.

1) शहर उपजीविका केंद्रामध्ये नागरिकांना/लाभार्थ्यांना बँके खाते उघडून देणे (2) विविध प्रशिक्षण, रोजगार विषयक माहिती व शासकीय योजनेची माहिती व सुविधा देणे (3) सामाजिक योजनांची माहिती देणे (4) वस्तू व उपकरणे केंद्र नोंदणी करणे (5) आधार कार्ड व पॅन कार्ड नोंदणी करणे (6) शहरी गरीब सेवेचे विपवणन करणे (7) शहरातील महिला बचत गटनिर्मित वस्तू व मालाचे विक्री केंद्र म्हणून ही शहर उपजीविका केंद्र (CLC) कार्य करेल.

सदरील ठिकाणी वरील सेवा व सुविधा पुरविण्याचा मानस असून यासाठी 1.महिला बचत गट (SHG) 2.वस्ती स्तर संघ (ALF) 3.शहर वस्ती स्तर संघ (CLF) यांना चालविण्यास देण्यात यावे असे निर्देश आहेत. त्यासाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालय कडून स्वतंत्र निधी प्राप्त झालेला आहे करिता त्यास मान्यतेसाठी मनपा सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर

विषय क्रं. 08

विषय :- नावाशमनपा हद्यीतील सीटीएस नं. 12825 मधील ईदगाह लगतच्या खुल्या जमिनीचे खेळाच्या मैदानासाठी भुसंपादन करणे बाबत.

महानगरपालिका हद्यीतील देगलुर नाका भागात सुमारे 2.00 लक्ष इतकी दाट लोकवस्ती असुन या भागात खेळाचे मैदानासाठी महापालिकेची उपलब्ध जागा नाही. या भागातील नागरीकांच्या सुदृढ

Scanned with CamScanner

आरोग्यासाठी खेळांच्या मैदानाची आवश्यकता आहे. खेळाचे मैदान उपलब्ध व्हावे यासाठी या भागातील नागरीकांची मागणी लक्षात घेता महानगरपालिका क्षेत्रात (मौजे ब्रम्हपुरी) ईदगाह लगतचे खुली जमीन शेत सर्वे क्रं. 5/1 ज्याचा नग भुमापन क्रं. 12825 आहे. सदर एकुण जमीनीचे क्षेत्रफळ 12716.00 चौ.मी. पैकी उपलब्ध मोकळी जमीन 10518.39 चौ.मी. इतकी जमीन खेळाच्या मैदानासाठी संपादन करता येऊ शकेल या जमिनीचा मालकी हक्क खालील प्रमाणे आहे.

1- श्री शेख उस्मान पि. शेख यु-हाण रा. हमीदीया कॉलनी, नांदेड

2- श्री अहेमद पि. हाजी अब्दुल नबीवाला रा. मॅपको कॉलनी, खय्युम प्लॉट नांदेड

3- श्री शेख महेमुद पि. शेख महेबुब रा. रहेमतनगर देगलुर नाका नांदेड

4- श्री शेख साजीद पि. शेख महेमुद मुसा रा. पाकीजानगर इदगाह रोड नांदेड

5- श्री शेख बशीर पि. शेख हुसेन रा. हमीदीया कॉलनी नांदेड

वरील मालमत्ताधारकांचे अखिव पत्र PR कार्ड प्रमाणे प्रत्येक 3143.20 चौ.मी. असुन TLR च्या मोजणी नुसार त्यांच्या हिश्याची जमीन संपादीत केली जाईल. संपादीत मालमत्ताधारकांना मुल्यांकन 2021 नुसारा भुसंपादनाचा मावेजा मानविंदुच्या नियमानुसार सानुग्रहासह अंदाजीत खर्च रोख रक्कम रु. 6.36 कोटी इतकी येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम 76, 77 नुसार सदर जमीन भुसंपादन करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी तसेच भुसंपादनासासठी लागणारी अंदाजीत रक्कम रुपये रु. 6.36 कोटी यास प्रशासकीय व आर्थीक मान्यतेस्तव प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

विषय क्रं. 09

विषय:- श्री दिलीप नारायण आरसुडे, कनिष्ठ अभियंता व श्री मो. रफतउल्ला खान मो. खलीलउल्ला खान, कनिष्ठ अभियंता, नांदेड वाघाळा शहर नांदेड यांना रिक्त असलेल्या उप अभियंता या पदावर पदोन्नती देणे बाबत.

संदर्भ :- निवड समितीचे इतिवृत दिनांक 23.11.2021

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता यांना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 07 मे 2021 मधील तरतुदीनुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवरील उप अभियंता या पदावर पदोन्नती देण्यासंदर्भात मा.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 23.11.2021 रोजी सकाळी 11.30 वाजता निवड समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर उप अभियंता या अभिनामाची 02 पदे रिक्त असुन, सदर पदाची वेतनश्रेणी (सहाव्या वेतन आयोगानुसार रु.15600-39100 ग्रेड पे 5400) सातव्या वेतन आयोगानुसार एस-20 रु.56100-177500 अशी आहे. सेवाजेष्ठता व अर्हतेनुसार सदरची पद भरणे आवश्यक आहे. सेवाजेष्ठता यादीतील अनु.क्र.01 वरिल श्री दिलीप नारायण आरसुडे कनिष्ठ अभियंता यांची शैक्षणिक अर्हता (डीसीई) असुन, त्यांची सेवा 20 वर्ष झाली आहे. अनु .क्र.02 वरिल श्री अनिल बाबुराव कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता यांची शैक्षणिक अर्हता (डीसीई) असुन, त्यांची सेवा 20 वर्ष झाली आहे तसेच अनु.क्र.03 वरिल श्री मो. रफतउल्ला खान मो. खलीलउल्ला खान, कनिष्ठ अभियंता, यांची शैक्षणिक अर्हता (बि.इ.सिव्हील) असुन, त्यांची सेवा 17 वर्ष झाली आहे.

सेवा जेष्ठता यादीतील अनुक्रमांक 01 वरील श्री दिलीप नारायण आरसुडे, कनिष्ठ अभियंता यांचे मागील पाच वर्षाचे गोपणीय अहवालाची प्रतवारी अनुक्रमे (अ व अ+) आहे. त्यांचे स्थायित्व प्रमाणपत्र, मत्ता व दायित्वाचे विवरणपत्र सादर केलेले आहेत. MS-CIT परिक्षा उत्तिर्ण आहेत.

सेवा जेष्ठता यादीतील अनुक्रमांक 02 वरील श्री अनिल बाबुराव कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता यांचे स्थायित्व प्रमाणपत्र आहे. तथापि मागील पाच वर्षाचे गोपनिय अहवाल व मत्ता व दायितवाचे विवरणपत्रे सादर केलेले नाहीत. तसेच त्यांनी MS-CIT परिक्षा उत्तिर्ण नाहीत.

Scanned with CamScanner

सेवा जेष्ठता यादीतील अनुक्रमांक 03 वरील श्री मो. रफतउल्ला खान मो. खलीलउल्ला खान, कनिष्ठ अभियंता यांचे मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवालची प्रतवारी अनुक्रमे (अ व अ+) आहे. त्यांचे स्थायित्व प्रमाणपत्र, मत्ता व दायित्वाचे विवरणपत्र सादर केलेले आहेत. दोघेही MS-CIT परिक्षा उत्तिर्ण आहेत.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक 07 मे, 2021 अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक 04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे दिनांक 25.05.2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत.

तसेच सदर शासन निर्णयातील क्रमांक 03 नुसार जे मागासवर्गीय अधिकारी/ कर्मचारी दिनांक 25.05.2004 च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नती मधील आरक्षणाचा लाभ घेवुन सेवा ज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत, असे अधिकारी/ कर्मचारी (अ) दिनांक 25.05.2004 रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रुजु झाले असल्यास ते त्यांच्या दिनाकं 25.05.2004 रोजीच्या सेवाज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील व (ब) दिनांक 25.05.2004 नंतर शासन सेवेत रुजु झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या मुळ सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील असे निर्देश आहेत.

श्री दिलीप नारायण आरसुडे, कनिष्ठ अभियंता यांची मुळ नेमणुक इमाव या प्रवर्गातुन झालेली असुन, त्यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी दिनांक 11.04.2014 रोजी झालेली आहे. तसेच श्री मो. रफतउल्ला खान मो. खलीलउल्ला खान, कनिष्ठ अभियंता यांची मुळ नेमणुक खुला या प्रवर्गातुन झालेली आहे. सेवा जेष्ठता यादीतील अनुक्रमांक 01 व 03 वरिल श्री दिलीप नारायण आरसुडे व श्री मो. रफतउल्ला खान मो.खलीलउल्ला खान हे उप अभियंता पदासाठी पात्रता व योग्यता धारण करित असल्यामुळे उप अभियंता या पदावर तात्पुरती त्यांची नेमणुक करणे उचित होईल. तसेच सेवाजेष्ठता अनुक्रमांक श्री अनिल बाबुराव कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हे उप अभियंता पदावरील पदोन्नतीसाठी आवश्यकत्या सर्व बाबी पुर्ण केल्यानंतर त्यांचा सेवाजेष्ठेनुसार विचार करण्यात येईल, अशी निवड समितीने शिफारस केली आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत श्री दिलीप नारायण आरसुडे, कनिष्ठ अभियंता व श्री मो. रफतउल्ला खान मो. खलीलउल्ला खान, कनिष्ठ अभियंता हे उप अभियंता पदासाठी जेष्ठता, योग्यता व पात्रता असल्याने दिनांक 07.05.2021 च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री दिलीप नारायण आरसुडे, कनिष्ठ अभियंता व श्री रफतउल्ला खान मो.खलीलउल्ला खान, कनिष्ठ अभियंता यांना उप अभियंता या पदावर (सहाव्या वेतन आयोगानुसार 15600-39100 ग्रेड-पे 5400) सातवा वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस-20 रु.56100-177500 मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात यावी व श्री अनिल बाबुराव कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता यांचे प्रकरण खुले ठेवण्यात यावे,अशी निवड समितीने शिफारस केली आहे.

करिता निवड समितीने वरिलप्रमाणे शिफारस केल्यानुसार श्री दिलीप नारायण आरसुडे, कनिष्ठ अभियंता व श्री मो. रफतउल्ला खान मो. खलीलउल्ला खान, कनिष्ठ अभियंता, यांना उप अभियंता या रिक्त पदावर (सहाव्या वेतन आयोगानुसार 15600-39100 ग्रेड-पे 5400) सातवा वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस-20, रु. 56100-177500 मध्ये पदोन्नती देणेबाबतचा प्रशासकीय प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव ठेवण्यात यावा.

विषय क्रं. 10

विषय :- बिएसयुपी योजने अंतर्गत शिल्लक घरकुल नांदेड शहरातील दिव्यांग व्यक्तींना वाटप करणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दी मध्ये केंद्र व राज्य शासनाच्या बिएसयुपी योजने अंतर्गत पुनर्वसन साईट येथे घरकुल बांधकाम करण्यात आलेले असुन श्रावस्तीनगर साईट क्रं. 34 गोवर्धनघाट व गौतमनगर, सांगवी या ठिकाणी एकूण 260 घरकुल वाटप करणे शिल्लक आहेत. दिव्यांग

Scanned with CamScanner

कल्याण कायदा 2016 व शासन निर्णय, नगरविकास क्र. दिव्यांग 2018/ प्र.क्र.52/ 18/ नवि-28 दिनांक 10 मे, 2018 अन्वये घरकुल वाटपामध्ये दिव्यांगासाठी किमान 5% घरकुल राखीव ठेवण्याबाबत तरतुद आहे. तसेच नांदेड शहरातील दिव्यांग व्यक्तींना घरकुल मागणीसाठी विविध संघटनांनी आंदोलने करण्यात आलेली आहेत.

त्याअनुषंगाने वृत्तपत्रात जाहिरात देऊन निकष क्र. 01 ते 13 च्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन एकूण 55 दिव्यांग लाभार्थी (100% अंध) यांची अंतिम यादी तयार करण्यात आली आहे. यापुर्वी 08 दिव्यांग बांधवांना घरकुल वाटप करण्यात आलेले आहे उर्वरित 43 लाभार्थ्यांना घरकुल वाटप करणे शिल्लक आहे.

सदरील पात्र लाभार्थी यांना लाभार्थी हिस्सापोटी रक्कम रुपये 23,500/- भरण्यासाठी लेखी पत्र देऊन पात्र लाभार्थी त्यांच्या हिस्सा भरणा केला आहे व उर्वरित 43 पात्र लाभार्थी पैसे भरणा केलेला नाही.

वरील दिव्यांक लाभार्थी पैकी 07 लाभार्थी हे 5% दिव्यां निधी मधुन उदरनिर्वाह निधी व्यवसाय पत्येकी रुपये 25,000/- प्रमाणे असे एकूण रुपये 1.75 लक्ष त्यांचे खात्यावर जमा करण्यात आले असुन 13 दिव्यांग लाभार्थी त्यांचा हिस्सा रुपये 23500/- प्रमाणे असे एकूण 305000/- भरणा केलेला आहे. उर्वरीत 43 लाभार्थी हे दिव्यांग लाभार्थी हिस्सास भरणा केलेला नाही.

मा. महापौर यांनी दिलेल्या पत्रानुसार एकुण शिल्लक दिव्यांग लाभार्थी 43 यांचा लाभार्थी हिस्सा 5% राखून ठेवण्यात आलेल्या दिव्यांग निधीतुन (उदरनिर्वाह) निधी व्यवसाय या पुर्वी लाभार्थी हिस्सा भरणा केला आहे ते संबंधीतास परत करण्यासाठी सदरचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

<u>स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना</u>

विषय क्र. 11 — प्रस्ताव

नांदेड महानगरपालिका हद्दीतील कल्याणनगर तरोडा खु. नांदेड येथील रहिवाशी असलेले श्री संदीप ग्यानोजी साळवे हे दिनांक 27.04.2007 पासुन विटा ता. खानापुर जि. सांगली येथे नगरपालिका शिक्षण विभागामध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहे. त्यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मध्ये प्राथमिक शिक्षक एकतर्फी आंतरजिल्हा बदलीसाठी विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर केला आहे.

श्री संदीप ग्यानोजी साळवे हे नांदेडचे मुळ रहिवाशी असल्यामुळे त्यांना आई-वडीलांच्या सेवेसाठी नांदेड येथे महापालिका शिक्षण विभागामध्ये येणे अत्यंत गरजेचे आहे.

करिता श्री संदीप ग्यानोजी साळवे प्राथमिक शिक्षक न. पा. शाळा नं. 12 विटा ता. खानापुर जि. सांगली येथून एकतर्फी आंतरजिल्हा बदली नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका शिक्षण विभागामध्ये करणे करिता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

सुचक :- तुप्पेकर संगिता सखाराम — अनुमोदक :- सौ. ज्योती मनिष कदम

विषय क्र. 12 — प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र. 15 मधील गाडीपुरा येथे जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा गाडीपुरा (उर्दु) सुरु असुन इयत्ता वर्ग-1 ते वर्ग-5वी पर्यंत जवळपास 81 विद्यार्थी शिक्षण घेत आहे. सदरची शाळा ही भाड्याच्या इमारतीमध्ये चालते परंतु शासनाने भाडे अदा करणे बंद करुन शाळा नजीकच्या जिल्हा परिषदेच्या शाळेस जोडण्याचे कळविले आहे.

परंतु सदरच्या भागात गरीब लोकांची वस्ती असुन शाळा स्थलांतर झाल्यास गरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असुन याबाबत पालकांनी शिक्षण विभाग जिल्हा परिषद नांदेड यांना विनंती केल्याने आपण त्यांना जागा उपलब्ध करुन दिल्यास त्या जागेत जिल्हा परिषदे तर्फे इमारत उभारुन शाळा त्याठिकाणी चालविण्याचे मान्य केले आहे.

Scanned with CamScanner

तरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊनये यासाठी महानगरपालिकेच्या बडीदर्गाह समोर असलेली ओपन जागा शाळेसाठी नाममात्र भाडेवर दिल्यास त्याच परिसरामध्ये शाळा सुरु राहील.

करिता बडीदर्गाह समोर असलेले ओपन जागा जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा गाडीपुरा (उर्दु) शाळेस नाममात्र भाडयावर देण्यास तसेच देण्यात येणा-या इतकी जागेचे आरक्षण बदलुन पब्लीक सेमीपब्लीक वापरासाठी 37 (1) ची कार्यवाही शासनास पाठविण्यास ही सभा सर्वानुमते मंजुरी देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

याबाबत आयुक्त यांनी 37(1) च्या कार्यवाहीच्या अधिन राहुन शाळा लवकरात लवकर सुरु होण्याच्या दृष्टीने जागा हस्तांतरणाची कार्यवाही करावी.

सुचक:- शबाना बेगम मो. नासेर अनुमोदक:- अब्दुल शमीम अब्दुल्ला

विषय क्रं. 13 प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या विविध विभागासाठी हार्डवेअर/ संगणक/ लॅन/ सर्वर यांचे देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी अनुभव असणारे खालील व्यक्तीची महापालिकेत संगणक चालकांची व त्यांच्या अनुभव लक्षात घेता सध्या ते विविध विभागात कामही करीत आहे त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 53 मधील तरतुदीनुसार सहानुभुतीच्या व मानवतेच्या दृष्टीकोणातुन प्रथमत: सहा महिण्याच्या कलावधीसाठी नियुक्ती देणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | नांव | अनुभव | सध्या काम करत असलेले विभागाचे नांव |
|---|---|---|---|
| 01 | श्री कुलकर्णी अमोल अनिलराव | हार्डवेअर/ संगणक हताळणे/ लॅन / सर्वर व मनपाकेच्या प्रशासकिय इमारतीतील सर्व विभाग व क्षेत्रीय कार्यालय येथील संगणकाचे देखभाल व हाताळण्याचे सालसन 2012 ते आज पावेता काम करीत आहे | संगणक विभाग |
| 02 | श्री विजय विठ्ठलराव धुतडे | ई-टेंडरींग/ हार्डवेअर/ संगणक हताळणे / लॅन / सर्वर व मनपाकेच्या प्रशासकिय इमारतीतील सर्व विभाग व क्षेत्रीय कार्यालय येथील संगणकाचे देखभाल व हाताळण्याचे सालसन 2009 ते आज पावेता काम करीत आहे | संगणक विभाग |
| 03 | श्री जोंधळे रविराज गंगाधर | संगणक चालक असुन त्यांना मालमत्ता कर वसुलीची नोंदीचे परीतपूर्ण अनुभव आहे तसेच बिएसयुपी च्या लाभार्थ्यांचे वसुली ऑनलाईन व्दारे नोंदणी करीत आहे. | बिएसयुपी विभाग |
| 04 | श्री मिर्झा आवेस बेग मिर्झा अर्शद बेग | सालसन 2015 पासुन स्वचछ महाराष्ट्र अभियान (नागरी) विभाग येथे डाटा एंट्री ऑपरेटर म्हणुन काम केरीत आहे. | स्वच्छ महाराष्ट्र अभियान विभाग |
| 05 | श्री शेख जमील अहेमद साब | रमाई आवास योजने अंतर्गत लाभार्थ्यांची ऑनलाईन व्दारे नोंदणी करुन डिपीआर ची कार्यवाही करणे | रमाई आवास योजना विभाग |

करिता वरील बाबी लक्षात घेता तसेच नादेड वाघाळा शहर महानगरपालिकेत संगणक चालकांची संगणक चालक म्हणुन प्रथम सहा महिण्यासाठी एकत्रीत वेतनावर/ मानधनावर नियुक्ती देण्यासाठी वरील अधिनियमातील तरतुदीनुसार सहानुभुतीच्या व मानवतेच्या दृष्टीकोणातुन नियुक्ती देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

सुचक :- अ. सत्तार अ. गफुर अनुमोदक :- उमेश पवळे

Scanned with CamScanner

विषय क्रं. 14 प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील प्रभाग क्रं. 12 मध्ये ईदगाह कब्रस्तान अंतर्गत सी.सी. रोड, संरक्षण भिंत व हायमास इत्यादी बसविण्यासाठी लागणारा खर्च रुपये 20.00 लक्षाचा निधी हा महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग शासन निर्णय क्रं. नाक्षेवि-2021/ प्र.क्र.81/ का-9 मंत्रालय मुंबई दिनांक 21 जानेवारी 2022 मधील तरतुदीनुसार मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

सुचक :- अ. सतार अ. गफुर अनुमोदक:- अ. रशीद अ. गणी

विषय क्रं. 15 प्रस्ताव

कै. डॉ. शंकरराव चव्हाण शासकिय रुग्णालय मध्ये रुग्णांच्या तक्रार निवारण तसेच रुग्णालयाच्या अडी अडचणी सोडविण्यासाठी तसेच तेथील सेवे मध्ये सुधारसाठी एक अशासकिय समीती असुन त्याच धर्तीवर महानगरपालिके तर्फे चालणा-या OPD व IPD साठी तज्ञ इच्छुकांची तसेच लोक प्रतिनिधीची एक समिती गटीत करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देऊन ठराव हयाच सभेत कायम करण्यात येतो.

सुचक:- स. शेर अली महेबुब अली अनुमोदक:- स. शोऐब मजहर हुसेन

विषय क्रं. 16 प्रस्ताव

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 चे कलम (9) मधील तरतुदीनुसार सर्व प्रकारच्या शाळांवर स्थानिक प्राधिकरण म्हणजेच महानगरपालिकेचे सनियंत्रण असणे आवश्यक आहे. त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या हद्यीतील शाळांसहीत जिल्हा परिषद, खाजगी अनुदानित व विनाअनुदानित सर्व शाळांवर प्रभावी सनियंत्रण राहणेसाठी नांदेड वाघाळा शहरा महानगरपालिकेकडे त्यांची आस्थापनासह वर्ग करण्याकरिता शासनास प्रस्ताव सादर करणेसाठी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

सुचक :- आनंद चव्हाण अनुमोदक :- मुळे कविता संतोष

स्वाक्षरीत/-
(स. अजीतपालसिंघ संधु)
नगरसचिव
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

Scanned with CamScanner